सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

क्र. ७] गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ : माघ ९, शके १९४७ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ छत्रपती संभाजीनगर विभाग

१

जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांजकडून
(नगरपरिषद प्रशासन)

वाचा:-

१. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१अ-१अ, ५१अ, ५१ ब आणि ९ (१) (ब)

२. महाराष्ट्र शासन, राजपत्र, छत्रपती संभाजीनगर भाग १-अ (असा)-३६ दि. २३.१२.२०२५.

३. महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक घेणे) नियम, २००५ व त्यामधील सुधारणा नियम दि. ०८.१२.२००६.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्य अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१०, सुधारणा नियम २०१२ व सुधारणा नियम २०१९.

५. महाराष्ट्र शासन परिपत्रक, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.४६६/नवि-२० दि. २१.१२.२०१६.

६. नगरपरिषद वैजापूर, सिल्लोड, कन्नड, गंगापूर, खुलताबाद व नगरपंचायत फुलंब्री पहिली सर्वसाधारण सभाचे इतिवृत्तांत.

आदेश

जा.क्र. २०२६/नपाप्र/निवडणूक-१३५ दि. २८/०१/२०२६.- ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१ अ (४) व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्य अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१० चे नियम ६ मधील तरतूदीनुसार उपाध्यक्ष व नामनिर्देशित झालेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

ज्याअर्थी, पीठासीन अधिकारी तथा अध्यक्ष, नगरपरिषद वैजापूर, सिल्लोड, कन्नड, गंगापूर, खुलताबाद व नगरपंचायत फुलंब्री यांनी महाराष्ट्र शासन परिपत्रक, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४६६/नवि-२० दि. २१/१२/२०१६ नुसार कार्यवाही करुन पहिल्या सर्वसाधारण सभेत उपाध्यक्ष निवडीचा व नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्याबाबत सभेचा इतिवृत्तांत सादर केला आहे.

त्याअर्थी, मी दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर याद्वारे असे जाहिर करतो की, नगरपरिषद वैजापूर, सिल्लोड, कन्नड, गंगापूर, खुलताबाद व नगरपंचायत फुलंब्री येथे आयोजित पहिल्या सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार नगरपरिषद / पंचायतीच्या नावासमोरील स्तंभ क्र. ०३ येथील उमेदवार उपाध्यक्ष म्हणून निवडून आले असून स्तंभ क्र. ०४ येथील नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत.

अ.क्र.	नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव	निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव	नियुक्त नामनिर्देशित सदस्याचे नाव
१	२	३	४
१	नगरपरिषद वैजापूर	श्री. शेख रियाज अकिल गब्बू शेठ	१. श्री. चव्हाण प्रकाश पंढरीनाथ
			२. श्री. कंगले प्रशांत प्रभाकरराव
			३. श्री. बोरनारे संजय नानासाहेब
२	नगरपरिषद सिल्लोड	श्री. विठ्ठल म्हतारजी सपकाळ	१. श्री. सहारे नंदकिशोर विठ्ठलराव
			२. श्री. जाधव सागर दामोधर
			३. श्री. शेख बाबर शेख गुलाब बागवान
३	नगर परिषद कन्नड	श्रीमती रंजना रवींद्र राठोड	१. श्री. कोल्हे संतोष किसनराव
			२. श्री. सुधाकर लक्ष्मण देवकर
			३. श्री. सय्यद अहेमद अली मोहम्मद
४	नगरपरिषद गंगापूर	श्री. अमोल सुभाषराव जगताप	१. श्रीमती सुवर्णा संजय जाधव
			२. श्रीमती शीतल संदेश गंगवाल
५	नगरपरिषद खुलताबाद	श्री. बारगळ नवनाथ विश्वनाथ	१. श्री. सय्यद मुखीमोद्दीन जियाओद्दीन
			२. श्री. बारगळ परसराम शिवाजी
६	नगरपंचायत फुलंब्री	श्री. पठाण जमीर सगीर	१. श्री. शेख आसिफ शेख अशफाक
			२. श्री. मुळे मनोज श्रीधरराव

ठिकाणः छत्रपती संभाजीनगर
दिनांक : २८/०१/२०२६.

स्वाक्षरीत/-
दिलीप स्वामी (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.